सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा




https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - १९८ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शुक्रवार दि. ५ सप्टेंबर २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## मुंबईत ४०० किलो आरडिएक्स;आत्मघातकी हल्ल्याची धमकी

### मुंबई पोलिसांना थरारक मेसेज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह असताना सार्वजनिक गणपती विसर्जनापूर्वी मुंबई पोलिसांना धमकीचा मेसेज आला आहे. मुंबई वाहतूक पोलिसांच्या व्हॉट्सअपवर आत्मघातकी हल्ल्याची धमकी आल्याने खळबळ माजली आहे. मुंबई शहरात ३४ वाहनांमध्ये जवळपास ४०० किलो आरडिएक्स प्लांट केले असून १ कोटीहून अधिक लोकांना मारण्याची ही योजना असल्याचं मेसेजमध्ये उल्लेख आहे.




या मेसेजनुसार, लष्कर ए जिहादीचे १४ पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसले आहेत असा दावा करण्यात आला आहे. पाकिस्तानी दहशतवादी संघटनेचा सदस्य असल्याचा मेसेज पाठवणाऱ्या व्यक्तीने दावा केला आहे. सप्टेंबर ३ तारखेला संध्याकाळी मुंबई वाहतूक पोलिसांच्या सोशल मिडिया व्हॉट्सअप नंबरवर हा मेसेज आला होता. या मेसेजची तात्काळ दखल घेत मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला ही बाब कळवली. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी मेसेज पाठवणाऱ्याची चौकशी सुरू केली आहे. या धमकीमुळे पोलीस सतर्क झाले आहेत. ठिकठिकाणी नाका तपासणी आणि कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे.

अशाच प्रकारे वरळीतील एका हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवल्याचा ईमेल नियंत्रण कक्षाला प्राप्त झाला होता. हॉटेलच्या ३ व्हिआयपी रूममध्ये ब्लास्ट होणार असल्याचा दावा करण्यात आला होता. जुलैमध्येही बॉम्बे स्टॉक एक्सचेंज उडवण्याची धमकी देणारा ईमेल यंत्रणेला मिळाला होता. या धमकीमुळे बीएसई इमारतील काही काळ दहशतीचं वातावण पसरले होते. सुरक्षा जवानांनी दलाल स्ट्रीट परिसर आणि संपूर्ण दक्षिण मुंबईत चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली.

दरम्यान, मुंबईत सध्या गणेशोत्सव सुरू आहे. मोठ्या प्रमाणात गणेशभक्त विसर्जनाच्या दिवशी रस्त्यांवर, चौपाटीवर गर्दी करतात. गणेश विसर्जनाच्या एक दिवस आधी मिळालेल्या या धमकीच्या मेसेजमुळे पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. मुंबई पोलिसांनी शहरातील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यासोबतच धमकीचा मेसेज पाठवणाऱ्याचा शोध सुरू केला आहे. काही दिवसांपूर्वी कळवा रेल्वे स्टेशन उडवण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर आता मुंबई वाहतूक पोलिसांना आलेला मेसेजची खातरजमा पोलिसांकडून केली जात आहे.

## सरसकट ओबीसी आरक्षण शक्य नाही मुख्यमंत्री फडणवीसांचा मराठा समाजाला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

मराठा समाजासंदर्भात राज्य सरकारने जो जीआर काढलेला आहे त्यामुळे इतर मागास प्रवर्गांना (ओबीसी) कोणताही फटका बसणार नाही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पत्रकारांना सांगितले. तसेच, सरसकट ओबीसीची मागणी सरकारने स्वीकारलेली नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानावरील उपोषण संपविण्याआधी उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा केली होती. त्यावेळी विखे पाटील यांनी सरकारच्या वतीने दिलेल्या आश्वासनानुसार हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदींनुसार मराठा समाजातील व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्यासंबंधीचा जो जीआर काढला आहे, त्यावरून काही ओबीसी नेत्यांनी विरोधाचा सूर लावला आहे.

यावर पत्रकारांनी लक्ष वेधले असता मुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही काढलेल्या जीआरचा कोणताही परिणाम ओबीसी आरक्षणावर होणार नाही. मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी सरकारने स्वीकारलेली नाही. ज्यांच्याकडे वैध पुरावे आहेत अशांना ओबीसीमध्ये जाण्यासाठीचा मार्ग जीआरद्वारे उपलब्ध करून दिला




आहे. या जीआरचा अभ्यास केल्यानंतर राष्ट्रीय ओबीसी महासंघाने त्याला मान्यता दिलेली आहे. भुजबळ यांनाही मी समजावून सांगितले आहे.

**हे राज्यआहे तोवर ओबीसींवर अन्याय नाही**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हा सरसकट जीआर नसून पुराव्यांचाच जीआर आहे. त्यामुळे ओबीसी समाजावर कुठेही अन्याय होणार नाही. हे राज्य आहे तोवर ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. मराठवाड्यात इंग्रज नाही तर निजामाचे राज्य होते. त्यामुळे इंग्रज राज्यातील पुरावे इतर ठिकाणी मिळतात. मराठवाड्यात मिळत नाहीत. तिथे निजामकाळातील म्हणजे हैदराबाद गॅझेटच्या नोंदी मिळतात. तेच आपण ग्राह्य धरले आहे.

## महाराष्ट्रात हलाल लाईफस्टाईल टाउनशिप होणार नाही

### महसूल मंत्री बावनकुळेंचे स्पष्ट आदेश रायगड कर्जत प्रकल्पावर कारवाईची ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर**

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हलाल टाउनशिपची निर्मिती करणाऱ्यांवर कारवाई करण्याची ग्वाही दिली आहे. सरकार हलाल टाऊनशिप सारख्या कोणत्याही टाउनशिपला मान्यता देणार नाही. हलाल पूर्णपणे बाहेर काढून टाकू. हलालचा बोर्डही काढून टाकू. हलालच्या नावावर राज्यात कुठेही टाउनशिप होणार नाही. या प्रकरणी संबंधितांवर कारवाई होईल, असे ते येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणालेत.



नागपूर जिल्हा परिषद निवडणुकीत लागू करण्यात आलेल्या झिरो रोस्टर संदर्भात अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांनी उच्च न्यायालय, नागपूर येथे याचिका दाखल केली आहे. या रोस्टरमुळे काही जिल्हा परिषद सर्कलमध्ये फिरते आरक्षण लागू झाले नाही आणि त्यामुळे आरक्षणाचा लाभ मिळाला नाही, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. यावर बोलताना बावनकुळे यांनी याचिका दाखल करणे हा याचिकाकर्त्यांचा अधिकार आहे. राज्य शासन कुठलाही अधिनियम कधीही वापरू शकते, ५ रोस्टर झाले, ६ व्या रोस्टरसाठी लोक मिळत नाही, विधी विभागाचे ओपिनियन घेऊन रोस्टरचा निर्णय घेतला, आम्ही आमची बाजु मांडू असे ते म्हणाले.

हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीवरून ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांची नाराजी नाही. आक्षेप आणि संभ्रम आहे, तो दूर करू. कुठल्या वाक्याबद्दल संभ्रम आहे त्यावर चर्चा करून तोडगा काढू असे स्पष्ट केले. हैद्राबाद गॅझेटमध्ये केवळ नोंद मिळाली म्हणून त्याआधारे सर्टिफिकेट देणार नाही. अधिकारी हे नियमाप्रमाणे सही करतील. कुठलेही कास्ट सर्टिफिकेट चॅलेंज होऊ शकते असे ते म्हणाले.

## 'सामना'मधून मुख्यमंत्री यांचे संयमी व संवेदनशील भूमिकेचे जाहीर कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

नेहमी टीकेची झोड उठवणाऱ्या शिवसेनेच्या मुखपत्रातून यंदा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कौतुकाची थाप देण्यात आली आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर 'सामना'मधून फडणवीस यांच्या संयमी व संवेदनशील भूमिकेचे जाहीर कौतुक करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी तोडगा काढला आणि आंदोलनाचा शेवट गोड झाला, अशा शब्दांत फडणवीस यांच्या भूमिकेचा गौरव करण्यात आला आहे. त्यांच्यावर चौफेर टीका होत असतानाही ते विचलित झाले नाहीत', असे गौरवोद्गारही सामनामधून नोंदवले गेले. यावर बोलताना बावनकुळे यांनी, सामना'ला देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यासाठी वेळ लागतो असे सांगताच सामना'चे आभार मानले आहे. सामना'कडून हीच अपेक्षा आहे. त्यांनी नेहमी कौतुक कारावे, अशी अपेक्षा महसूल मंत्री बावनकुळे यांनी व्यक्त केली.



## राज्यातील सर्व तालुके आणि गावांमध्ये होणार 'फार्मर कप' उपक्रमाची अंमलबजावणी- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### 'फार्मर कप' द्वारे १५ हजार शेतकरी उत्पादक गट तयार करण्याचे उद्दीष्ट; राज्य शासन आणि पाणी फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

राज्यातील सर्व तालुके आणि गावांमध्ये राज्य शासन व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'फार्मर कप' या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी कृषी विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य शासनाची उच्चस्तरीय समिती व पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राज्यात २०२६-२७ या वर्षासाठी १५ हजार शेतकरी उत्पादक गट तयार करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, उत्पादित शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे. शेतीमध्ये उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध पातळीवर अनेक उपाययोजना करत आहे. २३ मार्च २०२५ रोजी झालेल्या पाणी फाउंडेशनच्या वार्षिक कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रात सत्यमेव जयते फार्मर कप ची घोषणा करण्यात आली. सत्यमेव जयते फार्मर कप या उपक्रमाला व्यापक स्वरूपात राबविण्यासाठी राज्य शासन पाणी फाउंडेशनला सहकार्य करेल.



फार्मर कप या उपक्रमाला राज्य शासनाशी जोडल्याने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मदत होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देखील शेतकरी उत्पादक संघटना तसेच शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलत आहेत. विकसित महाराष्ट्र २०४७ मध्ये कृषी विकासाला अत्यंत महत्त्व देण्यात आले आहे. त्याच दृष्टीने राज्यातील हा उपक्रम देखील महत्वपूर्ण ठरेल, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले. पाणी फाउंडेशनने २०२१ पासून सत्यमेव जयते फार्मर कप या उपक्रमाच्या माध्यमातून ५० हजाराहून अधिक शेतकऱ्यांना शेतकरी गटात संघटित केले आहे. यापैकी जवळपास अर्धे गट महिला शेतकऱ्यांचे असल्यामुळे, हा उपक्रम महिला सक्षमीकरणासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरला आहे. सध्या, हा उपक्रम महाराष्ट्रातील ४६ तालुक्यांमध्ये आयोजित केला जातो. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. तरीही, ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीमध्ये सामूहिकीकरणासाठी लोकचळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि गावात विस्तार करण्याची क्षमता आणि गरज आहे.

**'फार्मर कप' ला लोकचळवळ बनवून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील**

राज्य शासनासोबतची भागीदारी पाणी फाउंडेशनला राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्याची मोठी संधी देत आहे. ज्ञान, प्रशिक्षण आणि सामूहिकीकरणाच्या माध्यमातून शेतकरी कुटुंबांचे उत्पन्न आणि उत्पादकता वाढवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करू. 'फार्मर कप'ला लोकचळवळ बनवून शेतकऱ्यांची उपजीविका उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे मत पाणी फाउंडेशनचे संस्थापक आमीर खान यांनी व्यक्त केले.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे १९ सप्टेंबरला नागपूरमध्ये चिंतन शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी, १९ सप्टेंबर २०२५ रोजी नागपूर येथे चिंतन शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. या शिबिरामध्ये पक्षाचे वरिष्ठ नेते, मंत्री, आजी-माजी आमदार, आजी-माजी खासदार, सर्व सेलचे प्रदेशाध्यक्ष, सर्व जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय कार्यकारिणीचे नेते यांचा समावेश असणार आहे.

युवकांचे बदलत्या आकांक्षांचे प्रश्न, समाजातील विविध घटकांच्या अपेक्षा, तंत्रज्ञान आणि समाज, युवकांची जीवनशैली आणि अपेक्षा, या गोष्टींना सामोरे जाण्याचे धोरण नव्याने विकसित करण्याचा प्रयत्न या चिंतन शिबिरात केला जाणार आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गावात प्रत्येक घरात पक्षाची विचारसरणी, भूमिका आणि योजना पोचवण्याचा धोरणावरही या चिंतन शिबिरात सांगोपांग चर्चा केली जाणार आहे असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

या चिंतन शिबिरात जे राज्यव्यापी धोरण निश्चित करु त्यानंतर पत्रकार परिषद घेऊन विस्तृत चर्चा आणि आगामी काळातील रणनीती याबाबतची सुरुवात कधी करणार आहोत हे योग्य वेळी सांगणार आहोत असेही सुनिल तटकरे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी आदी उपस्थित होते.

## गणपती विसर्जनात पहिल्यांदाच मुंबई पोलिसांकडून बंदोबस्तात एआयचा वापर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

विसर्जनाची पूर्ण तयारी मुंबई पोलिसांना केली आहे. रस्ते, चौपाटी, वाहतूकीची सगळी तयारी पूर्ण झालेली आहे. घरगुती गणेश विसर्जन, मंडळातील मोठ्या गणपती मूर्तीच्या विसर्जनाची तयारी पूर्ण झाली असून चौपाटीच्या ठिकाणी बीएसमी, स्वयंसेवक असतील. प्रत्येक ठिकाणी कडेकोट बंदोबस्ताचं नियोजन केलंय, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली. मुंबईत १० हजार कॅमेरे लावण्यात आले



आहेत. ड्रोनद्वारे देखील सगळ्या विसर्जनावर नजर ठेवण्यात येणार आहे. पोलिसांच्या पेट्रोलिंगच्या गाड्या असतील. कंट्रोल रुम देखील सज्ज आहे. पोलिसांनी दिलेल्या सगळ्या सूचनाचं पालन करा, असं आवाहन मुंबई पोलिसांकडून करण्यात आले आहे. तसेच यंदा पहिल्यांदाच मुंबई पोलिसांकडून बंदोबस्तात एआयचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती देखील मुंबई पोलिसांनी पत्रकार परिषदेत दिली.

**सह पोलीस (आयुक्त कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी काय म्हणाले?**

गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आला आहे. महापालिकेसोबत मिळून आम्ही बंदोबस्त आखला आहे. ६५०० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आहेत. दीड ते दोन लाख घरगुती गणपती मुंबईत आहेत. ६५ नैसर्गिक विसर्जन स्थळ आहे. २०५ कृत्रिम तलाव आहेत. तसेच विसर्जन मार्गावरील रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून मुंबईवर लक्ष ठेवलं जाईल. १२ अतिरिक्त पोलीस आयुक्त, ४० डीसीपी, ६१ एसीपी यावेळी बंदोबस्तात तैनात असतील. सोबत ३००० अधिकारी आणि १८,००० पोलीस कर्मचारी देखील तैनात असतील. सोबत राज्य राखीव पोलीस दलाच्या १४ तुकड्या, चार शीघ्र कृती दलाच्या तुकड्या तीन दंगल नियंत्रण पथकाच्या तुकड्या, आणि इऊॐ ला देखील सज्ज ठेवण्यात आले आहेत. १०००० सीसीटीव्ही कॅमेरातून विसर्जनावर लक्ष ठेवलं जाईल. तसेच ड्रोन कॅमेऱ्याने नजर ठेवली जाईल. -ख चा देखील मुंबई पोलीस बंदोबस्तकरीता वापर केला जाणार आहे. परवानगी शिवाय ड्रोन उडवण्यास बंदी असणार आहे. सध्या वेशातील पोलीस देखील तैनात असतील. दहशतवाद विरोधी उपाययोजना देखील घेण्यात आल्या आहेत.

## ओबीसी समाज उतरला रस्त्यावर; औंढा- जिंतूर मार्ग रोखला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५हिंगोली**

मराठा आरक्षणासाठी मुंबई झालेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा समाजाच्या मागण्या मान्य करत शासन आदेश काढला आहे. मात्र या आदेशानंतर ओबीसी समाज आक्रमक झाला असून मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारने काढलेला जीआर तातडीने रद्द करावा; अशी मागणी करत हिंगोलीत ओबीसी समाज बांधवांनी औंढा जिंतूर राज्यमार्ग रोखून धरत आंदोलन केले आहे.



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन केले. पाच दिवस चाललेल्या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटनुसार मराठा समाजाच्या मागण्या करत शासन आदेश काढला आहे. मात्र यानंतर ओबीसी समाज आक्रमक झाला असून राज्यात ठिकठिकाणी ओबीसी समाजाकडून सरकारचा निषेध करत आंदोलन केले जात आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील औंढा- जिंतूर मार्ग रोखून धरत सरकारच्या विरोधात आंदोलन केले आहे. येळी पाटी येथे हजारोच्या संख्येने ओबीसी बांधव आंदोलनासाठी एकत्र जमले होते. दरम्यान सरकार ओबीसी समाजाची दिशाभूल करत असल्याचा गंभीर आरोप यावेळी ओबीसी नेते चंद्रकांत लव्हाळे यांनी केला. तर कुणबी दाखल्याच्या आधारे ओबीसीमध्ये लाखो मराठा घुसखोरी करण्याची शक्यता असल्याने सरकारने घेतलेला निर्णय तातडीने रद्द करावा; अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली होती.

## संपादकीय ......

# दिवाळी भेट!

स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटी दरांमध्ये मूलगामी परिवर्तन आणले जाईल, अशी घोषणा केली होती. त्याची अंमलबजावणी कधी होणार, याकडे सर्वांचे लक्ष होते. त्यांनी दिलेला शब्द खरा करून दाखवला. जीएसटी परिषदेच्या राज्यांशी झालेल्या सहमतीतून ५ टक्के आणि १८ टक्के अशा द्विस्तरीय जीएसटी दर रचनेला बुधवारी मंजुरी देण्यात आली. म्हणजेच १२ आणि २८ टक्के हे कर दराचे टप्पे रद्दबातल करण्यात आले. जीएसटीत करांचे दर वेगवेगळे असू नयेत, अशी अपेक्षा अर्थतज्ज्ञांनी प्रथमपासूनच व्यक्त केली होती. आता केवळ दोनच टप्पे राहणार असल्यामुळे त्यांची ही अपेक्षा पूर्ण झाली. त्यामुळे सामान्य जनतेला दिलासा मिळेल. अर्थात, उत्पादक आणि व्यापारीवर्गाने हा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवला पाहिजे.

सामान्य आणि मध्यमवर्गीयांच्या नित्य वापराच्या वस्तू त्याचप्रमाणे केसतेल, साबण, सायकलींवरील जीएसटी १२ किंवा १८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर येणार आहे. रोटी, पराठे, जीवरक्षक औषधांवर शून्य टक्के कर लावला जाणार आहे. कर्करोगाच्या औषधांवरील कर शून्य टक्के करण्यात आल्यामुळे हजारो रुग्णांना मोठाच दिलासा मिळेल. दूध, पनीर आणि अनेक जीवनावश्यक वस्तू करमुक्त करण्यात आल्या. नमकीन, सॉस, पास्ता आणि तूप यासारख्या वस्तूंवरील कर १२ टक्के किंवा १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर आणण्यात आल्यामुळे त्यांच्याही किमती घटतील. सर्व प्रकारचे टीव्ही, छोट्या मोटारी, ३५० सीसी मोटरसायकलींवर कर घटून तो २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणण्यात आला. सणासुदीचे दिवस असल्यामुळे किमती घटल्यास मागणी वाढणार आहे आणि त्यातही जे उद्योग रोजगारप्रधान आहेत, त्यांचा फायदा होऊन असंख्य तरुण-तरुणींना रोजगार प्राप्त होणार आहे. त्याचवेळी १२०० सीसी क्षमतेच्या पेट्रोल आणि १५०० सीसीपेक्षा अधिक क्षमतेच्या डिझेल कारवर ४० टक्के कर लादण्यात येणार आहे.

पानमसाला, तंबाखू उत्पादने तसेच साखरयुक्त पेयांवर ४० टक्के असा विशेष जीएसटी दर आकारला जाणार असून, शरीराला अपायकारक अशा गोष्टींचा वापर त्यामुळे कमी होणे अपेक्षित आहे. आरोग्य व जीवन विमा हप्ते संपूर्ण करमुक्त करण्याचे पाऊल अत्यंत स्वागतार्ह आहे. सध्या आरोग्य आणि जीवन विमा प्रीमियमवर १८ टक्के जीएसटी वसूल करण्यात येतो. आता तो रद्द करण्यात आला असल्यामुळे विमा पॉलिसी किफायतशीर आणि स्वस्त होईल. विमा क्षेत्र व्यापक होईल आणि अधिकाधिक लोक याचा फायदा घेतील.

पॉलिसींच्या प्रीमियममध्ये सुमारे १५ टक्क्यांपर्यंत कपात होईल. मोठ्या प्रीमियमबाबत ही रक्कम लक्षणीय असेल. ग्राहकांच्या खिशावरील ताण झाल्याकारणाने अधिकाधिक लोक या पॉलिसी खरेदी करण्याची शक्यता आहे. नव्या कर रचनेमुळे केंद्राला ९३ हजार कोटी रुपयांची महसुली तूट सोसावी लागणार असून, ऐषोरामाच्या आणि हानिकारक वस्तूंवरील ४० टक्के अशा सर्वोच्च दराच्या माध्यमातून ही तूट भरून करता येऊ शकेल. यातून सुमारे ४५ हजार कोटी रुपयांची भर सरकारी तिजोरीत पडणे अपेक्षित आहे. अर्थव्यवस्थेत सध्या महागाईचे प्रमाण घटले आहे. येत्या काळात ती आणखी कमी होण्याची अपेक्षा आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के जादा शुल्क आकारल्यामुळे निर्यातीस झळ पोहोचणार असून, त्यामुळे काही प्रमाणात बेरोजगारीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. या निर्णयामागे तेही कारण दिसते.भारताची देशांतर्गत बाजारपेठ मोठी असल्याने त्याची तीव्रता कमी असेल. अमेरिकेच्या धोरणांमुळे निर्यातदार व कारखानदारांची जी हानी होईल, ती काही प्रमाणात जीएसटी सुधारणांमुळे भरून निघण्याची आशा आहे. अमेरिकेने उभ्या केलेल्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्याच्या दृष्टीने हे पाऊल उचलणे जरुरीचेच होते; परंतु जीएसटी सुसूत्रीकरणामुळे आपले उत्पन्न कमी होईल, अशी भीती राज्यांना वाटते. वास्तविक, राज्यांनी तशी भीती बाळगण्याचे कारण नाही. उलट त्यांना याचा फायदाच होणार आहे, अशी केंद्र सरकराची भूमिका आहे. प्रत्यक्षात चालू आर्थिक वर्षअखेरीस राज्यांचा एकत्रित कर महसूल १४ लाख १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त राहील, असा होरा आहे.२०१८ आणि २०१९ मध्ये जीएसटी प्रणालीच्या दर सूत्रीकरणाचे प्रयोग राबविण्यात आले. जीएसटी दरांमध्ये कपात केल्यामुळे मासिक संकलनात सुमारे ५ हजार कोटी रुपयांची घसरण होईल; मात्र ही घसरण तात्पुरती असेल आणि उलट दरांना कात्री लावल्यामुळे प्रत्यक्षात महसुलात दरमहा पाच ते सहा टक्के दराने वाढ सुरू होईल, असे केंद्राच्या यापूर्वीच्या अभ्यासातून दिसून आले; मात्र काही निवडक वस्तूंसाठी ४० टक्के दराने करांचा टप्पा प्रस्तावित करण्यात आला. परिणामी, सध्याच्या व्यवस्थेतील ऐषोरामी आणि 'डीमेरिट' वस्तूंवरील १ ते २९० टक्के इतकी राज्यांना भरपाई म्हणून उपकराची असलेली व्यवस्था मोडीत निघेल. त्यातून राज्यांचे लक्षणीय महसुली नुकसान होईल, असे सांगितले जाते. म्हणूनच देशातील आठ विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांनी महसुली भरपाईची मागणी केली आहे.

राज्यांचा सरासरी महसुली तोटा सुमारे दीड ते दोन लाख कोटी रुपयांच्या घरात जाईल, अशी भीती व्यक्त केली जाते. केंद्र आणि राज्यांमध्ये महसूलरूपी जीएसटी समसमान प्रमाणात विभागला जातो. प्रत्येकाला संकलनाच्या ५० टक्के रक्कम मिळते. कर विनियोजनाच्या यंत्रणेअंतर्गत केंद्राचा ४१ टक्के वाटा राज्यांकडे परत जातो. याचा अर्थ एकत्रितपणे एकूण जीएसटी महसुलापैकी ७० टक्के महसूल राज्यांकडे जातो. म्हणजेच राज्यांना एसजीएसटीमध्ये किमान १० लाख कोटी रुपये आणि विनियोजनाद्वारे ४ लाख १ हजार कोटी रुपये मिळतील, अशी शक्यता आहे, तरीदेखील राज्यांच्या मनात काही शंका असतील, तर त्या दूर होण्याची आवश्यकता आहे. राज्यांचे उत्पादनाचे स्रोत कमी असून, त्यांच्या मूलभूत गरजा भागणे तितकेच गरजेचे आहे.

# सतत पडणाऱ्या पावसाच्या परिस्थितीत तूर, मुग व उडीद पिकांसाठी अत्यंत महत्वाचा सल्ला




**दि.५विदर्भ प्रजासत्ताक** – सध्या स्थितित सतत पडणारा पाऊस यामुळे मुग, उडीद आणि तूर पिकाची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. सद्य परिस्थितीत मुग आणि उडीद ही पिके काढणी अवस्थेत तर तूर शाखीय व गुंड्या लागण्याच्या अवस्थेत आहेत.

सतत पडणारा पाऊस यामुळे आणि जमिनीतील ओलावा यामुळे पिकाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हे टाळण्यासाठी वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाच्या बदनापूर येथील कृषि संशोधन केंद्राने खालील उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**मुग आणि उडीद**

पिकाची काढणी सुरु आहे तेंव्हा शेंगा ओल्या राहणार नाहीत याची काळजी घेणे गरजेचे आहे.

शेंगा ओल्या असतील तर त्या शेड मध्ये सुकविणे अत्यंत गरजेचे आहे.

**तूर-** तूर पिकात जास्तीच्या पावसाने पाणी साचले असल्यास निचरा करावा. या करिता उताराच्या दिशेने चर काढावे.

पूर्ण पाण्याचा निचरा झाल्यानंतर १९:१९:१९ या विद्राव्य खताची (१०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी ) फवारणी करावी.

अतिवृष्टी जास्तीचा पाऊस यामुळे जमीन खरडली गेली असल्यास तुरीला मातीची भर द्यावी.

बुरशीची लागण होऊ नये म्हणून एकरी ४ किलो बायोमिक्स किंवा ट्रायकोडर्माची आळवणी करणे गरजेचे आहे.

**किंवा**

कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्रॅम आणि युरिया २०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

शक्य असल्यास पाने गुंडाळणाऱ्या अळीसाठी व इतर किडींसाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५% निंबोळी अर्काची फावरणी घ्यावी.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# स्नायूक्षीणतेचा असाध्य आजार

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

स्नायू हे आपल्या शरीराचे आधारस्तंभ आहेत. चालणे, धावणे, श्वास घेणे, बोलणे, अगदी दैनंदिन जीवनातील सर्व हालचाली या स्नायूंमुळेच शक्य होतात; परंतु काही अनुवांशिक कारणांमुळे हेच स्नायू हळूहळू कमकुवत होऊ लागतात आणि अखेरीस साधीशी शारीरिक हालचालही अशक्य होते. या विकाराला वैद्यकीय भाषेत 'मस्क्युलर डिस्ट्रॉफी' असे म्हटले जाते. सुमारे ३० हून अधिक प्रकारचे स्नायू-दुर्बलता विकार यामध्ये समाविष्ट आहेत. त्यांचे स्वरूप, लक्षणे व परिणाम मात्र वेगवेगळा असतो.



या विकाराचे स्वरूप बालपणापासून वृद्धापकाळापर्यंत कोणत्याही टप्प्यावर दिसून येऊ शकते. काही प्रकार जन्मत: आढळतात, तर काही बालपण, तरुणपण किंवा मध्यम वयात उघड होतात. यांपैकी सर्वाधिक चर्चेतला प्रकार म्हणजे ड्युशेन मस्क्युलर डिस्ट्रॉफी. तो प्रामुख्याने लहान मुलांमध्ये आढळतो आणि लक्षणे साधारणपणे तिसर्या ते सहाव्या वर्षी दिसू लागतात. यामध्ये मुलांनाच जास्त बाधा होते आणि विकार अत्यंत तीव्र स्वरूपाचा असतो. बेकर मस्क्युलर डीस्ट्रॉफी हा तुलनेने सौम्य असला तरी हळूहळू वाढत जातो व किशोरवयीन अवस्थेत प्रकट होते. काही मुले जन्मत:च कॉंजेनिटल मस्क्युलर डिस्ट्रॉफी घेऊन येतात. यामुळे त्यांच्या बालपणावर मोठा परिणाम होतो. तसेच फेशिओ-स्कॅप्युलो-ह्युमरल डिस्ट्रॉफी हा प्रकार चेहरा, खांदे आणि वरचे हात यांच्या स्नायूंना बाधा करतो आणि किशोरवयीन टप्प्यात दिसून येतो.

# सण-उत्सव काळात परतवाडा, अचलपुरात कृत्रिम पाणीटंचाई

## नागरिक पाण्याच्या प्रतीक्षेत; टँकरवाल्यांकडून दामदुप्पट

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५परतवाडा-** ऐन सण-उत्सवाच्या काळात अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरात पाणीटंचाईने डोके वर काढले आहे. गेल्या दोन दिवसांपासून संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. जलशुद्धीकरण केंद्रावर झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. मात्र या बिघाडाबाबत कोणतीही पूर्वसूचना न मिळाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.सण-उत्सवाच्या दिवसांत घराघरात स्वच्छतेची तसेच पाहुणचाराची लगबग असते. अशा वेळी पाणीपुरवठा ठप्प झाल्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली आहे. अनेकांना पिण्यासाठीसुद्धा पाणी मिळत नसल्याने खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. टँकरवाल्यांनी दर दुप्पट आकारल्याने सामान्य नागरिकांचे हाल झाले आहेत. पालिका प्रशासनाने जलशुद्धीकरण



केंद्रावरील बिघाड दुरुस्तीसाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगत आज सायंकाळपर्यंत जुळ्या शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे. शहरातील मूलभूत गरजांपैकी पाणी पुरवठ्याबाबतच जर निष्काळजीपणा होत असेल तर लोकांनी नेमका कोणावर विश्वास ठेवायचा? असा सवाल नागरिक करत आहेत. दरम्यान, पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तात्पुरती टँकर व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शहरातील विविध सामाजिक संघटनांनी केली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मागील काही वर्षांपासून प्रत्येक सण-उत्सवाच्या काळात पाणी टंचाईची कृत्रिम समस्या निर्माण केली जाते. अखेर प्रशासनाने तातडीने बिघाड दूर करून शहराचा पाणीपुरवठा सुरू करावा.अचलपूर शहरातील बहुतांश नागरिक पालिकेच्या पाणी पुरवठ्यावर अवलंबून असतात. अचानक पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे पाण्यासाठी भटकंती होत आहे. पालिका प्रशासनाने तत्काळ सज्ञान घेऊन ही समस्या निकाली काढावी अशी मागणी माजी आरोग्य सभापती बंटी ककरानीया यांनी केली आहे.

# ८ सप्टेंबरला, विभागीय महिला लोकशाही दिन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती,** – महिला व बालविकास विभागाच्या ४ मार्च २०१३ च्या शासन निर्णयानुसार समस्याग्रस्त पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरिता व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा यादुष्टीने महिलांच्या तक्रारी/अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवून समाजातील समस्यासग्रस्त/पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्तस्तरावर, तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय तर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुका स्तरावर तहसिल कार्यालय या ठिकाणी आयोजित करण्यात येतो.तरी समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागीय उपआयुक्त विलास मरसाळे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# नवसारी जवाहर नगरमध्ये अष्टविनायक मंडळात नवनीत राणांचा सहभाग

## गणरायाचे दर्शन घेत ढोल वाजवत साजरा केला उत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती,** अमरावतीच्या नवसारी जवाहर नगर येथील अष्टविनायक गणेशोत्सव मंडळात आज भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी उपस्थित राहून गणरायाचे दर्शन घेतले.गणेशमूर्तीच्या पूजनानंतर राणा यांनी मंडळाच्या सांस्कृतिक उत्साहात सहभाग घेत ढोल वादनाचा आनंद लुटला. स्थानिक नागरिकांनी त्यांचे स्वागत जल्लोषात केले.या प्रसंगी त्यांनी नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आणि सांस्कृतिक परंपरेचा गौरव राखण्याचे आवाहन केले. नवसारी परिसरातील गणेशभक्तांमध्ये त्यांच्या भेटीमुळे विशेष उत्साहाचे वातावरण होते.



# पंचायत समिती मोर्शी च्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मोर्शी** – गुरुवार ४ सप्टेंबर रोजी तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामरोजगार सेवक ,केंद्र चालक यांची तालुकास्तरीय कार्यशाळा घेऊन त्यांना अभियानाबाबत माहिती देण्यात आली.सदर अभियान दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत १०० दिवसाच्या मोहीम स्वरूपात राबवण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.याप्रसंगी माननीय गटविकास अधिकारी श्री स्वप्निल मगदूम, तहसीलदार श्री सागर ढवळे, तालुका



वैद्यकीय अधिकारी श्री महेश जयस्वाल, सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीमती प्रीती खटिंग, बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती सुजाता देशमुख, पशुधन विकास अधिकारी श्री प्रमोद ढोबळे, श्री सुधाकर भिवगडे विस्तार अधिकारी पंचायत, श्री भोजराज पवार विस्तार अधिकारी पंचायत, श्री ज्ञानेश्वर गायकवाड विस्तार अधिकारी शिक्षण, श्री विश्वास फंदे विस्तार अधिकारी कृषी, श्री जयंत गारले विस्तार अधिकारी आरोग्य,आणि श्री विक्रांत शेंदरकर विस्तार अधिकारी सांख्यिकीआणि पंचायत समितीचे विभाग प्रमुख उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी श्री स्वप्निल मगदूम यांनी केले. सदर कार्यशाळेला प्रवीण प्रशिक्षक म्हणून श्री भोजराज पवार विस्तार अधिकारी पंचायत व श्री अजय फाटे ग्रामपंचायत अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी पंचायत श्री सुधाकर भिवगडे यांनी केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ५ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# दर्याबाद येथील युवकाने पेढी नदीपात्रात घेतली उडी

## वलगाव येथील धक्कादायक घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५- वलगाव** अमरावती जिल्ह्यातील वलगाव येथे दिनांक तिन सप्टेंबर बुधवार रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास धक्कादायक घटना घडली आहे सोमेश्वर पद्माकर शेगोकार वय वर्ष तीस राहणार दर्याबाद तालुका भातकुली जिल्हा अमरावती या युवकाने वलगाव येथील पेढी नदीवर नव्याने बांधण्यात आलेल्या पुलावरून थेट नदीत उडी घेतली आहे मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार दुचाकीने युवक व त्याची बहीण आणि जावई हे अमरावती वरून त्यांच्या दर्याबाद या गावी जात होते मात्र त्यांच्या गावी जात असताना त्यांच्यात दुचाकी वर शाब्दिक बाचाबाचीला सुरुवात झाली आणि युवकानी थेट त्याची दुचाकी वलगाव येथील नव्याने बांधण्यात आलेल्या पेढी नदी पुलावर उभी केली व पेढी नदीपात्रात उडी



घेतली युवकाच्या सोबत असलेल्या त्यांच्या बहिण व जावयाने लगेच जवळ असलेल्या वलगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली व घडलेला सर्व घटना क्रम वलगाव पोलिसांना सांगितला वलगाव पोलिसांनी तात्काळ घटनेचं गांभीर्य लक्षात घेता घटनास्थळी धाव घेतली व घटनेची माहिती रेस्क्यू पथकाला दिली रेस्क्यू टीम तात्काळ घटनास्थळी पोहोचली व शोध मोहिमेला सुरुवात केली युवक हा खड्यात फसला असल्यामुळे व गंभीर रित्या जखमी झाल्यामुळे बेशुद्ध अवस्थेत नदीपात्रातील गाळात फसला असल्यामुळे युवकाला बोलता येत नव्हते रेस्क्यू टीमने अथक प्रयत्न करून युवकाला नदीपात्रातील गाळातून बाहेर काढले व युवकाचे प्राण वाचविले पुढील उपचाराकरिता युवकाला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले आहे पेढी नदीवर नव्याने बांधण्यात आलेल्या पुलावर सुरक्षा कठडे नसल्यामुळे व पथदिवे नसल्यामुळे पेढी नदीवर नव्याने बांधण्यात आलेला पूल हा वाहन चालकांसाठी धोकादायक ठरत आहे या संपूर्ण घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस करत आहे-

# अमरावती जिल्ह्यात ३१७ शिक्षकांच्या बदल्या

## ४ सप्टेंबरपासून कार्यमुक्ती, ६ सप्टेंबरपासून नवीन शाळांमध्ये हजर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती** शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत ३१७ प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या करण्यात आल्या



असून, संबंधित शिक्षकांना ४ सप्टेंबर रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात येणार आहे. त्यानंतर, ५ सप्टेंबर रोजी शासकीय सुटी असल्यामुळे हे शिक्षक नवीन शाळांमध्ये ६ सप्टेंबर रोजी रुजू होतील, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिली आहे.शासनाच्या बदल्या धोरणानुसार व प्राप्त निर्देशांच्या अधीन राहून ही बदली प्रक्रिया ऑनलाईन पोर्टलद्वारे पार पडली आहे. विशेष संवर्ग शिक्षक भाग १ (४४), विशेष संवर्ग शिक्षक भाग २ (१५३), बदली अधिकार प्राप्त शिक्षक (८०), व बदलीपात्र शिक्षक (४०) अशा एकूण ३१७ शिक्षकांचा यात समावेश आहे.

संबंधित शिक्षकांचे संगणकीय आदेश गट शिक्षणाधिकारी कार्यालयांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले असून, तात्काळ अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले आहेत.

चिखलदरा व धारणी तालुक्यांतील शाळांमध्ये शून्य शिक्षकसंख्या होणार नाही याची विशेष दक्षता घेण्यात येणार असून, पर्यायी व्यवस्था करूनच कार्यमुक्ती करण्याचे निर्देश गट शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

# रोजंदारी मजुरांच्या भरवशावर गुगामल वन्यजीव विभाग

## घरूनच हाकतात वरिष्ठ अधिकारी जंगलाचा कारभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मेलघाट**

गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा अंतर्गत खोंगडा, बेलकुंड, कोहा, तारूबांधा चिखलदरा, अशी वर्तुळ कार्यालय आहेत वर्तुळ मधील जंगलात विवीध ठिकाणी कॅम्प उभारले आहेत प्रत्येक कॅम्प वर एक वनरक्षक, एक वनमजुर व ३ रोजंदारी मजूर मिळून गस्ती करण्याचा नियम आहे पण जंगलाचा कारभार रोजंदारीवर असलेल्या मजुरांच्या भरवशावर असून वनरक्षक वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी जंगलाचा कारभार घरूनच हाकतात असे बुधवारी वाघाने प्रेम मुन्ना कासदेकर या वनमजुराला ठार केल्याच्या घटनेवरून सिध्द होते.मेळघाट व्याघ्रप्रकल्प हे चार विभागात व्यापले आहे यात सिपना वन्यजीव, गुगामल वन्यजीव, मेळघाट वन्यजीव अकोट वन्यजीव आहेत या प्रत्येक विभागाला स्वतंत्र व्याघ्रप्रकल्पात प्रत्येक कॅम्प वरून एक वनरक्षक, वनमजुर व तीन रोजंदारी मजूर सोबत घेऊन जंगलाची गस्ती करणे किवा ३० किलोमीटर




जंगलात जीपीएस घेऊन ट्रॅक करण्याचा नियम आहे पण गुगामल वन्यजीव विभागातील वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी हे आपल्या घरून परतवाडा अमरावती सारख्या शहरातून कारभार हाकतात त्यामुळे येथे काम करणाऱ्या रोजदारीवर काम करणाऱ्या अप्रशिक्षित मजुरांच्या भरवशावर वन्यजीव विभागाचा कारभार चालतो अशातच रोजंदारी मजुरांच्या जीवाला धोका निर्माण झाल्यास त्याला जवाबदार कोण हे ह्या घटनेमुळेप्रश्न उद्भवत आहे.

**बिनतारी संदेशाद्वारे दिली जाते खोटी माहिती-** मेळघाट व्याघ्रप्रकल्पात सर्वच वर्तुळात तसेच कॅम्प वर बिनतारी संदेशाद्वारे कर्मचारी हजेरी सकाळ संध्याकाळ दिली जाते पण येथे हजेरी देणारे कर्मचारी मुख्य कार्यालयाला खोटी माहिती देऊन खोटी उपस्थिती दर्शवितात. त्यामुळेच वनकर्मचाऱ्या दांड्या मारणे सोपे झाले आहेत.दोघे रोजंदारी वनमजुर कालिकुंडी कॅम्प ला मुक्कामी गेले होते त्यांना एकटे पाठविणे हे संबधीत वनरक्षक वनपालाची चूक आहे मी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करतो असे गुगामल वन्यजीव विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल दाईत यांनी सांगितले.

# उद्यापासून शहरात ५९० तर ग्रामीणमध्ये १४१७ मंडळ बाप्पांचे विसर्जन

## आरसीपी, क्युआरटीसह ५२८४ पोलिस बंदोबस्तावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** -गेल्या १०दिवसांपासून मुक्कामी असलेल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्याची तयारी गणेश मंडळांसोबत शहर ग्रामीण पोलिस प्रशासनाने सुद्धा केली आहे. शहरात ५९० गणेशोत्सव मंडळात गणेशाची स्थापना झाली. तर तर ग्रामीण भागात १४१७ गणोशोत्सव मंडळांमध्ये गणपती बाप्पा विराजमान झालेत. तर ग्रामीण भागातील ३७२ गावातएकगावएक गणपती उपक्रम राबविण्यात आला. आता या सर्वांची विसर्जन मिरवणूक मुख्यत: शनिवार ६ सप्टेंबरपासून सुरु होत आहे. या अनुषंगाने शहरामध्ये कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये व गणेशोत्सव आनंदात साजरा होण्यासाठी शहरात सीपी अरविंद चावरिया तर ग्रामीणमध्ये एसपी विशाल आनंद यांच्या नेतृत्वात अमरावती पोलीसदलसुसज्ज ठेवण्यात आले आहे. त्यानुसार शहरामध्ये सुमारे २०१० पोलिस कर्मचारी तर ग्रामीण भागात ३२७४ पोलिस कर्मचारी असे एकूण ५२८४ ऑन ड्युटी तैनात राहणार आहेत.२७ ऑगस्ट पासून ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान शहरासह संपूर्ण जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. याअनुषंगाने, गणेश स्थापना बंदोबस्ताकरीता पोलीस आयुक्तालय स्तरावर ०३ पोलीस उपायुक्त, ०३ सहा. पोलीस आयुक्त, ३० पोलीस

### छत्री तलाव, प्रथमेष तलाव, कोंडेश्वर तलावासह सर्वत्र चोख व्यवस्था

### महत्वाचे चौक, गर्दीचे ठिकाणे, संवेदनशिल भागात फिक्स पॉईंट

निरीक्षक, ७० सपोनि /पोउपनि १३५० पोलीस अंमलदार, आरसीपी व क्युआरटी प्लॉटून, ०१ एसआरपीएफ कंपनी व १ प्लॉटूनसह ४०० + १०० पुरुष व महीला होमगार्डस् असा मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त नेमण्यात येणार आहे.तसेच, पो. ठाणेनिहाय शहरातील महत्वाचे चौक, गर्दीचे ठिकाणे, मिश्र व संवेदनशिल वस्तीच्या ठिकाणी फिक्स पॉईट लावण्यात येणार आहे.नागरीकांचे सुरक्षेकरीता १४ सीआर मोबाईल, महीला सुरक्षेकरीता १० दामिनी पथके तैनात करण्यात आलेली आहे, तसेच, वृध्द नागरीक व बालकांच्या सुरक्षेकरीता पोलीस विभाग सज्ज आहे. तसेच, बीट मार्शल व डायल ११२ ची वाहने ही शहरात सतत पेट्रोलिग करीता राहणार आहे.

त्याचप्रमाणे सोशल मिडीयावर सायबर पो. ठाणेच्याविशेष पथकाकडून सतत बॉच ठेवण्यात येणार असुन मिरवणूक मार्गावर ठिकाणी सीसीटीव्ही, व्हीडीओग्राफर याचे माध्यमातून आक्षेपार्ह लक्ष ठेवण्यात येणार आहे. स्थापनामिरवणूकीमध्ये ज्वलनशिलपदार्थ, शस्त्रे,



काठ्या, गाणेवाजविणे, आक्षेपार्ह देखावे प्रदर्शित करणे इत्यादी बाबींवर बंदी घालण्यात आलेले आहे. अमरावतीकरांनी यापुर्वी, जातीय सलोखा व सामाजिक एकोपा अबाधित ठेवून शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था ठेवणेबाबत पोलीसांना सहकार्य केलेले आहे. त्याअनुषंगाने, आगामी धार्मिक सणवउत्सवाचेवेळी सुध्दा अशाच प्रकारे सहकार्य करण्याचे व जातीय सलोखा व एकोपा ठेवण्याचे आवाहन सीपी अरविंद चावरीया यांनी केले आहे.

# रेल्वेत चढताना इसम जखमी, एक पाय झाला वेगळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** - पाणी पिण्यासाठी उतरलेल्या इसमाचा धावत्या रेल्वेत चढताना पाय घसरला. या अपघातात तो जखमी झाला असनू, धामणगाव रेल्वे स्टेशनवर घडलेल्या या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे.



जखमी युवमाचे नाव मोहम्मद शकील नूर मोहम्मद (वय वर्ष ४८ राम नवी वस्ती बडनेरा) येथे राहणार युवकाचा अपघात धामणगांव रेल्वे स्टेशनवर झाला आहे.रेल्वेमध्ये पेन्ट्री साइडर म्हणून मोहम्मद शकील हा काम करतो धामणगांव रेल्वे स्टेशनवर कोल्हापूर गोंदिया ही एक्सप्रेस थांबली असता पाणी पिण्यासाठी युवक उतरला व चालत्या गाडीत चढतेवेळी त्याचा पाय घसरल्याने त्याचा अपधात झाला.

एक पाय गुडघ्याच्या खालून काही अंतरावरून वेगळा झाला तर दुसऱ्या पायाचा अर्धा पंजा चेंदा झाला. सदर युवकास रेल्वो पोलिस अमर वानखडे वसहकार्यांने व काही युवकाच्या मदतीने ग्रामीण रुग्णालय येथे ॲम्बुलन्सची वाट न पाहता स्ट्रेचर वर आणले. प्रथम उपचारानंतर पुढील उपचाराकरता अमरावती येथे युवकाला पाठविण्यात आले. चालत्या रेल्वेत चढणे स्वत:साठी घातक असून काही झाल्यास परिवाराला किती त्रास होतो याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे.

# गडगाभांडूम जंगलात वाघाने केली गोऱ्याची शिकार

### ढाकणा, बोरिखेडा, दाभ्या, अढाव, साक्या, भांडूम गावात दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५धारणी,-** धारणी पासून २५ किमी. अंतरावर असलेल्या ढाकणा वनपरीक्षेत्रातील गडगाभांडूम गावातील शेतकरी रेशम पाटील यांच्या गोयाची शिकार केली. त्यामुळे आजुबाजुच्या परीसरातील ढाकणा, बोरिखेडा, दाभ्या, अढाव, साक्या, भांडूम गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ढाकणाचे रेंजर राजेश महल्लेयांनी या प्रकरणाविषयी कारवाई करून मोबदल्यासाठी प्रकरण वरीष्ठ कार्यालयास पाठविल्याची माहिती आहे. धारणी पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या पण चिखलदरा तालुक्यातील गडगा भांडूमशिवारात दोन दिवसांपूर्वी रमेश पाटील यांच्या गोह्याची गावाजवळच्याच जंगलात वाघाने ठार मारल्याने ढाकणा,



बोरिखेडा, दाभ्या, अढाव, साक्या, भांडूम,गावात मोठी खळबळ उडाली. खोंगडा गावाजवळ प्रेममुन्ना कास्देकरच्या शिकारीमुळे या भागात तसेच जंगलात कामे करणाऱ्या आदिवासींची मोठी घाबरगुंडी उडाली आहे. त्यात आणखी भर वाघाने बछड्याची शिकार केल्यामुळे सर्वत्र दहशतीचे वातावरण आहे. ढाकणा वनपरीक्षेत्र अधिकारी यांनी पुढील कारवाई केली आहे.

# दाभा गावात बांधकाम कामगारांचा संताप!

## किचन सेट वाटपासाठी हजारोंची गर्दी

## नियोजनाअभावी गोंधळाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ दाभा-** बांधकाम कामगारांसाठी शासनाच्या योजनेंतर्गत किचन सेट वाटपाचा कार्यक्रम सुरु असताना, नियोजनशून्य अंमलबजावणीमुळे दाभा गावात प्रचंड गोंधळ आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमासाठी संपूर्ण जिल्ह्यातील लाभार्थ्यांना केवळ दाभा गावातच बोलावण्यात आल्यामुळे स्थानिक यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी, चार ते पाच हजारांहून अधिक बांधकाम कामगार आणि त्यांचे कुटुंबीय दाभा येथे एकत्र जमा झाले आहेत.लाभ मिळवण्यासाठी अनेक नागरिक रात्रीपासूनच रांगेत उभे राहिले होते. पहाटेपर्यंत तीन ते चार किलोमीटर लांब रांग लागली होती. रांगेत गर्भवती महिला, लहान मुले, वयोवृद्ध नागरिक देखील दिसत असून त्यांना अन्न, पाणी, निवारा अशा मूलभूत गरजांसाठीही झगडावे लागत आहे.

पहाटेपासून उभं आहोत, अजूनही नंबर नाही. एवढा त्रास सहन करावा लागतोय, हे न्याय्य आहे का? असा प्रश्न अनेक लाभार्थ्यांनी उपस्थित केला आहे. काहींनी मोठ्याने आवाज करत संतापही व्यक्त केला.नागरिकांची मागणी - 'तालुकावार केंद्र हवे!'नागरिकांचा ठाम आग्रह आहे की, बांधकाम कामगारांसाठी किचन सेट वाटप तालुकावार आयोजित केले जावे. प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र



केंद्र ठेवले पाहिजे. संपूर्ण जिल्ह्याला एका गावात खेचणे हा सर्वसामान्यांवरील अन्याय आहे.

प्रशासनाकडे प्रश्न अनुत्तरितच!या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये प्रशासनाच्या नियोजनावर तीव्र नाराजी असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणताही स्पष्ट खुलासा मिळालेला नाही.-

# फुलाने सजवलेल्या डोलीतून 'देव' जातात जलविहाराला

## अचलपुरातील बियाबानी चौकात तीन फुलडोल येतात एकत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अचलपूर-** शहरात दरवर्षी भाद्रपद एकादशीला फुलडोल हा धार्मिक महोत्सव मोठ्या उत्साहात, वाजत गाजत साजरा करण्याची ऐतिहासिक परंपरा आहे. या दिवशी विविधरंगी फुलांनी सजवलेल्या डोलीतून देव जलविहाराला निघतात. फुलांनी सजवलेल्या डोलीला फुलडोल असे म्हणतात. जलविहार करून देव परत घरच्या देव्हाऱ्यात येतात. ही परंपरा २५० वर्षांपेक्षा अधिक काळापासून जोपासली जात आहे. या दिवशी गावातील नागरिक सजून, महिला नऊवारी साडी घालून देवाला जलविहाराच्या ठिकाणापर्यंत पोहोचवतात. शोभायात्रेत फुगडी, लेझीम, ढोल-ताशे, डीजेच्या तालावर नागरिक थिरकतात.अचलपूर शहरातील चावलमंडी भागातील स्व. रतनबाबू चौधरी यांच्या घरून निघणारी फुलडोल सर्वात मोठी असते. या फुलडोलला इतिहास असून शहरात मानाचे स्थान आहे. या मानाच्या मोठ्या फुलडोल मागोमाग देवडी परिसरातील सत्यनारायण मंदिरातून गोपाल झंवर, मनोज झंवर कुटुंबाच्या मार्गदर्शनात तर जुना सराफातील राम मंदिरातून सुभाष अग्रवाल, दिलीप सेंगर, राजू सेंगर, नंदू केवट, भुपेन पुरबगोला, रमेश भूषण शर्मा, राजू खोलापूरे, माणिक देशपांडे, पवन बुंदेले, पुजारी आशुतोष मिश्रा यांच्या मार्गदर्शनात विविध फुलडोल निघतात.

शहरातून एकूण तीन फुलडोल निघतात. बसस्टँडकडे जाणाऱ्या बियाबानी चौकात या तिन्ही फुलडोल एकत्र येतात. त्या ठिकाणी छोटी जत्रा भरते. शेकडो महिला पूजन करून देवाचे दर्शन घेतात. देवांना फुल चढवतात, देवाच्या फुलडोल खालून ये- जा करतात. अचलपूर नगर पालिकेचे माजी नगरसेवक स्व. रतनबाबू यांच्याकडे मानाचा फुलडोल हा उत्सव परंपरेने शरद चौधरी, अनिल चौधरी, अशोक चौधरी, संजय चौधरी यांच्या



कुटुंबीयांच्या माध्यमातून साजरा केला जातो. या फुलडोलमधून राधा-कृष्ण देव बाहेर काढले जातात. फुलाने सजवलेल्या या डोलीत देवांना बसवून अमिनाथवरील नदीच्या पात्रात तिन्ही फुलडोल पाण्यावर इकडून तिकडे फिरवतात. तरंगत ठेवत नदीच्या पाण्याचा स्पर्श देवांना करतात, यालाच जलविहार म्हटले जाते. अमिनाथावर तिन्ही फुलडोल एकत्र येऊन पूजा-अर्चना केली जाते. पाच आरत्या म्हटल्या जातात. प्रसाद वाटप होते. त्यानंतर रात्री देवाला घेऊन परतीचा प्रवास केला जातो. देवाच्या प्रत्येक घरासमोर पूजन केले जाते. नंदकिशोर ककरानिया यांच्या घराजवळ फुलडोलचे श्रद्धाभावाने पूजन करत त्या ठिकाणी आनंदोत्सव साजरा केला जातो. भजने म्हटली जातात. अशा प्रकारे अचलपूर शहरात फुलडोल मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या उत्सवात राष्ट्रीय हायस्कूलचे विद्यार्थी सहभागी होतात. जगदीश ठाकूर परंपरेनुसार मशालीची ज्योत तेवत ठेवतात. शंकरलाल शर्मा परिवारातील सदस्य फुलडोलची सेवा करत असतात. जुना बसस्टँडजवळील हनुमान मंदिरा जवळ देवडी येथील मित्र मंडळाने यंदा भक्तांसाठी चहापाण्याची व्यवस्था केली होती. त्याचा बहुतेक भाविकांनी लाभ घेतला. अचलपूर शहरातील फुलडोल उत्सव म्हणजे देवाच्या पूजेसह जल्लोषाचे दुसरे नाव आहे. गणेशोत्सवाच्या काळातच हा उत्सव साजरा होत असतो, हे विशेष. महालक्ष्मी (गौरी) विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी फुलडोल उत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. फुलडोल उत्सवात लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वच सहभागी होत असतात. देवाला जलविहार करून परत आणले जाते. तत्पूर्वी त्याला वाजत गाजत जलविहारासाठी नेले जाते. या वेळी राधा-कृष्णाचा जयघोष केला जातो.

# चंद्रभागा, सापन धरणाच्या जलसाठ्यात झाली वाढ

## चंद्रभागाचे ३ तर सापनचे २ दरवाजे उघडले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणांच्या जलसाठ्यात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. परिणामी अचलपूर तालुक्यातील महत्त्वाची धरणे चंद्रभागा व सापन या दोन्ही धरणांचे पाणी पातळी वाढली असून, प्रशासनाने सुरक्षिततेच्या दृष्टीने दरवाजे उघडण्याचा निर्णय घेतला आहे. चंद्रभागा धरणाचे ३ दरवाजे तर सापन धरणाचे २ दरवाजे नियंत्रित स्वरूपात उघडले असून, मोठ्या प्रमाणावर पाणी नदीपात्रात सोडले जात आहे. नदीकाठच्या गावांनी सतर्कता बाळगावी, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

धरण क्षेत्रात गेल्या आठवडाभरात पावसाचे जोरदार आगमन झाले आहे. यामुळे जलसाठा झपाट्याने वाढला. सध्या चंद्रभागा धरण ९६.५९ टक्के टक्क्यांपेक्षा जास्त भरले असून, या धरणाचे तीन दरवाजे ५ सेंमीने उघडून पाण्याचा विसर्ग

सिंचनाचा प्रश्न निकाली निघणार या वर्षीच्या पावसामुळे धरण पूर्ण क्षमतेने भरले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे परिसरातील पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटणार असल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा पुरस्कार वितरण सोहळा थाटात

## पुरस्कारामुळे बळ मिळतं कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** पुरस्कार मिळाल्याने आपली जबाबदारी वाढत असली तरी हा सन्मान आपल्याला अधिक चांगले कार्य करण्यासाठी बळ देतो असे प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले.श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्काराचा वितरण सोहळा आज मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात पार पडला. यावेळी मुख्य अतिथी म्हणून कुलगुरू बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालक नीलिमा टाके यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ड.गजानन पुंडकर, ड.जे.व्हि.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे,सुभाषराव बनसोड, सचिव डॉ.वि.गो ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य अंबादास कुलट नरेशचंद्र पाटील,प्राचार्य पी.एस वायाळ, प्राचार्य अमोल महल्ले यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते म्हणाले की





भाऊसाहेबांच्या कर्तृत्व व दूरदृष्टीमुळे आज आपल्याला हा सुवर्ण क्षण पाहता येतो आहे. पुरस्कार मिळणे हा शेवट नसून खऱ्या अर्थाने कार्याची पहिली पायरी आहे.पुरस्कारामुळे आपली जबाबदारी वाढली त्यामुळे आपल्याकडे आदर्श व्यक्ती म्हणून समाजात पाहिले जाईल. तसे कार्य आता आपणास करावे लागेल असा सल्ला देखील कुलगुरूंनी दिला. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले. उत्कृष्ट प्राचार्य म्हणून डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल त्र्यंबकराव देशमुख यांना स्व.पी.डी चौधरी स्मरणार्थ ताराबाई पांडुरंग चौधरी यांच्या दाननिधीमधून उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्यात आला. स्व. डॅडी देशमुख स्मृती पुरस्कार वरिष्ठ महाविद्यालयातील उत्कृष्ट शिक्षक म्हणून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे डॉ. गजानन अरुणराव वाघ यांना देण्यात आला. उत्कृष्ट महिला प्राध्यापिका पारितोषिक पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ.पुष्पा शंकरराव जुनघरे यांना देण्यात आला. वनमाला माधवराव कोहळे यांच्या स्मृति प्रित्यर्थ प्रा. अनिल कोहळे यांच्या दाननिधीमधून या पुरस्काराची राशी देण्यात आली. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अकोला येथील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिका सुशीला हरिश्चंद्र मळसणे यांना हिरोजी उलेमाले स्मृती कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्षक पुरस्कार स्व. वेणूताई उलेमाले यांनी दिलेल्या दाननिधी मधून प्रदान करण्यात आला. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक पुरस्कार कस्तुरबा कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना हनुमंत लुंगे यांना संस्थेच्या वतीने देण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालय महिला शिक्षकांचा पुरस्कार अकोला येथील डॉ.अर्चना माणिकराव पोटे यांना प्रदान करण्यात आला. वर्ग पाच ते दहा मधील माध्यमिक शाळा मधून उत्कृष्ट शिक्षकाचा पुरस्कार दैनिक मंडल चे संपादक अनिल अग्रवाल यांच्यातर्फे स्वर्गीय जुगल किशोरजी अग्रवाल यांच्या स्मृतिपित्यर्थ डॉ. वृषाली बाबुराव चौखंडे यांना देण्यात आला. उत्कृष्ट प्राथमिक शिक्षक पुरस्कार दर्यापूर येथील आदर्श प्राथमिक शाळेच्या सविता अशोक पुसदकर यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्रवीण रामदास गोंडीकर यांना उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी म्हणून हिरोजी उलेमाले स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तर शाळांमधील उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी म्हणून द्विवार्षिक कृषी विज्ञान पदवी पदविका अभ्यासक्रम रुलर अमरावती येथील सुधीर रामभाऊ भटकर यांना स्व. बी.एस उर्फ डॅडी देशमुख स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यावर्षीचा माध्यमिक शाळा गुणवत्ता पुरस्कार हातोडी बुद्रुक बुलढाणा येथील शिवाजी हायस्कूल ला देण्यात आला विद्यारत्न शंकरराव उपाख्य मामासाहेब लोंढे स्मृती स्वर्गीय शोभना लोंढे यांचे दाननिधीमधून मान्यवरांचे उपस्थितीत हा पुरस्कार मुख्याध्यापक जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांना प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थे अंतर्गत विविध महाविद्यालयातून गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना देखील सन्मानित करण्यात आले.अकोट येथील योगिता शंकरराव चव्हाण ह्या विद्यार्थिनीला स्व.निलेश भांबुरकर स्मृती पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यासोबतच अकोला येथील रेवती संजय वानखडे, अकोट येथील श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालयाची वृषाली गलांडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील मोहिनी गजानन ढोरे, अकोला येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या शिफा ना सय्यद हबीब, शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अकोट येथील गौरी ज्ञानेश्वर वानखडे, श्री शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अकोला येथील वृषाली वासुदेवराव वहिले या गुणवंत विद्यार्थ्यांचा विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका व पुरस्काराचे स्वरूप आणि आयोजन याबद्दल सविस्तर माहिती दिली. संचालक प्रा .डॉ.मनीष गायकवाड व प्रा अपर्णा देशमुख यांनी केले प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांनी आभार मानले.

**चांगल्या कामाचे कौतुकच**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये काम करणाऱ्या सर्वांनाच मार्गदर्शन व सहकार्य मिळते. परंतु जे चांगले काम करतात त्यांचे आम्ही नेहमी कौतुकच करतो. तुमचे कौतुक केल्याने आम्हाला आनंदच मिळतो. त्यामुळे चांगले काम करा आणि इतरांनाही तसे प्रवृत्त करा असे मार्गदर्शन हर्षवर्धन देशमुख यांनी केले. सोबतच श्री शिवाजी संस्थेला दानराशी दिल्याबद्दल सर्व प्राचार्यांचे तसेच दैनिक मंडलचे संपादक अनिल अग्रवाल यांचे त्यांनी आभार मानले.

### तर चांगला समाज निर्माण होईल

ज्यांना पुरस्कार मिळाला त्यांच्याकडून चांगले सेवा कार्य घडेल यात कोणतेही दुमत नाही. परंतु असे पुरस्कार मिळाल्याने समाजात चांगला संदेश तर देता येतोच शिवाय चांगला समाज निर्माण होण्यासाठी मदत देखील होते. आज स्त्रिया सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे शिवाजी शिक्षण संस्थेत देखील सर्वाधिक पुरस्कार महिलांना मिळाले हा प्रेरणादायी सोहळा पाहून आपल्यालाही ऊर्जा मिळाल्याचे प्रतिपादन विभागीय शिक्षण उपसंचालक नीलिमा टाके यांनी केले.

### हतेडी येथील श्री शिवाजी हायस्कूल ला उत्कृष्ट शाळेचा पुरस्कार

### स्व.जुगल किशोर अग्रवाल यांचे नावे आदर्श शिक्षक पुरस्कार

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारासाठी दात्यांनी दाननिधी दिलेला आहे. यावर्षी पासून वर्ग पाच ते दहा मधील माध्यमिक शाळा मधून शिक्षकांसाठी स्व.जुगल किशोरजी अग्रवाल यांच्या स्मृतिपित्यर्थ उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देण्यात येणार आहे. उल्लेखनीय म्हणजे पहिल्यांदाच रोख पुरस्कार यानिमित्ताने दरवर्षी शिक्षकांना मिळणार आहे.दैनिक मंडल चे संपादक अनिल अग्रवाल यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व कार्यकारिणीला धनादेश दानराशी म्हणून सुपूर्द केला. याबद्दल अनिल अग्रवाल यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले. तसेच प्राचार्यांनी घेतलेल्या चाळीसव्या वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनातून शिल्लक राहिलेल्या अतिरिक्त निधी पाच लाख रुपयाचा धनादेश प्राचार्य अंबादास कुलट व प्राचार्य रामेश्वर भिसे यांनी संस्थेला प्रदान केला. याबद्दल सर्व प्राचार्यांचे देखील संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

# आयुक्तालय स्तरावर डी. जे. मालकांची बैठक

## रात्री १० वा. नंतर डीजे वाजायला नको बैठकीत पोलिस प्रशासनाचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** : डॉल्बी सिस्टीम लेजर चा वापर कोणी करणार नाही. डी. जे. १०.०० वाजता बंदझालाच पाहीजे. निवासी क्षेत्रात ५५ डेसीबल व्यापारी क्षेत्रात डेसीबल व औद्योगिक क्षेत्रांत ७५ डेसीबल इतकी ध्वनिची मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे.रात्री १०.०० ते सकाळी ०६.०० वा. या वेळेत सार्वजनीक ठिकाणी कोणतेही वाद, ध्वनिक्षेपक वाजवण्यास मनाई केलेली आहे. आदी सर्व नियमांचे पालन करण्यात यावे. नियमांचे उल्लंघण करणाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल, अशा सूचना यावेळी पोलिस अधिकाऱ्यांनी केल्या.

अमरावती पोलीस आयुक्तालयाचे वतीने पोलीस आयुक्तालय स्तरावर डी. जे. मालक बैठक आयोजित केली.



### 'डॉल्बी सिस्टीम लेजर' वापरास प्रतिबंध

या बैठकीला सर्व डी.जे. मालकयांना पोलीस उपायुक्त परिमंडळ १ गणेश शिदे व पोलीस उपायुक्त परिमंडळ २ श्याम घुगे तसेच पोलीस निरीक्षक राजापेठ पुनित कुलट, पोलीस स्टेशन कोतवाली कोटनाके, पो.स्टे. फ्रेजरपुराशिरसाठ, पोलीस निरीक्षक बडनेरा चव्हाण पोलीस निरीक्षक विशेष शाखा निलेश करेव २५ ते ३० डी. जे मालक उपस्थीत होते. पोलीस उपायुक्त परिमंडळ १ व २ यांनी डी. जे. मालक यांना आवश्यक त्या अशा प्रकारे सुचना दिल्यात. डॉल्बीसिस्टीम लेजर चा वापर कोणी करणार नाही. डी. जे. - १०.०० वाजात बंद झालाच पाहीजे अन्यथा कारवाई करण्यात येईल

# अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेची वार्षिक सभा ७ सप्टेंबरला

## सभासदांना ८% लाभांश मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

दि. अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लिमिटेडची ४८वी व संस्थेची ६३वी वार्षिक साधारण सभा रविवार, दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता क्षितीज पॅलेस, न्यू रिंग रोड, नवसारी नाका, अमरावती येथे होणार आहे. या सभेस सभासदांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन सरव्यवस्थापक राजेश प्र. देशमुख यांनी केले आहे.

या वार्षिक सभेत आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीच्या विविध विषयांवर चर्चा होणार आहे. बँकेच्या मागील वर्षीच्या सभेचा वृत्तांत वाचन व मंजूरी, आर्थिक अहवाल, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद मंजूरी, तसेच जादा खर्चास मान्यता देणे, २०२५-२६ चे अंदाजपत्रक मंजूर करणे आदी बाबी सभेपुढे मांडल्या जातील.या वर्षी बँकेला झालेल्या नफ्यातून सभासदांना ८% लाभांश देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. यासंबंधी सूचना व प्रश्न ३१ ऑगस्टपर्यंत लेखी स्वरूपात मागविण्यात आले होते.याशिवाय, लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवाल, पुढील वर्षासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक, संचालक मंडळ व त्यांच्या कुटुंबीयांना दिलेल्या कर्जाचे विवरण, सभासद प्रशिक्षण, सेवा नियम व एच.आर. पॉलिसीमध्ये सुधारणा, उपविधी दुरुस्ती, नवीन शाखांसाठी प्लॉट खरेदी व इमारत बांधकाम, तसेच बुडीत व संशयित कर्जांच्या निर्लेखनासंदर्भातही चर्चा होणार आहे.अध्यक्षांच्या परवानगीने वेळोवेळी येणाऱ्या विषयांवरही चर्चा करून सभेची मान्यता घेतली जाणार आहे.या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष गोकुलदास श्रीरामजी राऊत, उपाध्यक्ष मो. नाझीम अ. गफ्फार, तसेच संचालक मंडळ सदस्य तुळशिदास धांडे, प्रफुल्ल शेंडे, सुरेंद्र मेटे, कैलास कडू, उत्तम चुनकीकर, अजयानंद पवार, रामदास कडू, रा.ना. गावंडे, मनिष काळे, विजय कोठाळे, संभाजी रेवाळे, राजेश गाडे, सौ. सरिता काठोळे, सौ. संगीता तडस, ॲड. राजपाल वानखडे व ॲड. शकील अहमद यांनी केले आहे.

# दुहेरी हत्याकांड प्रकरणात रोहनसह कुटुंबीयांचाही समावेश करा

## मृतकाच्या नातेवाईकांची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५तिवसा**

तिवसा शहरातील अशोकनगर भागात ३ सप्टेंबर रोजी सकाळी घडलेल्या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण शहरात खळबळ उडवली आहे. वडिलांच्या बदल्याच्या भावनेतून रोहन सुधाकर अवझाड या तरुणाने अमोल डाखोरे व त्यांच्या पत्नी सुशीला डाखोरे यांची धारदार शस्त्राने सपासप वार करत निर्घृण हत्या केली होती.या हत्येमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी रोहन अवझाड याला ताब्यात घेतले. दुसऱ्या दिवशी, ४ सप्टेंबर रोजी त्याला तिवसा येथील न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणी दरम्यान पोलिसांनी आरोपीस पोलीस कोठडीत घेण्याची मागणी केली होती. न्यायालयाने ती मंजूर करत ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, मृतक अमोल डाखोरे यांची पत्नी मंगला डाखोरे व मुलगा हिमांशू डाखोरे यांनी थेट तिवसा पोलीस ठाण्यावर धडक दिली. त्यांनी गंभीर आरोप करत, या हत्याकांडात केवळ रोहनच नाही, तर त्याचा भाऊ, आई व आणखी एक व्यक्ती सहभागी असून, त्यांच्यावरही गुन्हा दाखल करावा, अशी ठाम मागणी केली.

या मागणीच्या पार्श्वभूमीवर पोलीस ठाण्यासमोर मोठा जनसमुदाय जमा झाला होता. नागरिकांचा आक्रोश व मृतकांच्या नातेवाईकांचा आक्रमक पवित्रा पाहता काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. या वेळी पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, संतप्त नागरिक व नातेवाईक आपल्या मागण्यांवर ठाम राहिले.

# शासकीय ज्वारी केंद्र पुर्ववत सुरु करा; अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेतक-यांची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यामध्ये यावर्षी ब-याच शेतक-यांनी ज्वारीचे पीक घेतले असताना तालुक्यातील फक्त १८५ शेतक-यांच्या ज्वारीची मोजणी झाली आहे. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांची ज्वारी घरीच पडून आहे त्यामुळे शासनाने ज्वारी केंद्र पुर्ववत सूरु करण्यात यावे यासाठी सागर हुरबडे राजू आकोटक यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार अंजनगाव सुर्जी यांच्याकडे मागणी केली आहे.अंजनगाव सुर्जी तालुक्यातील बरेचश्या शेतक-यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे, परंतु अजूनही त्यांची ज्वारी शासकीय मोजणी झाली नाही. पावसामुळे ज्वारी पिक घरात पडून आहे, ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही, म्हणून पुर्ववत शासकीय ज्वारी केंद्र सुरु करावे, असे लेखी निवदेनाव्दारे तालुक्यातील शेतकरी सागर हुरबडे, छगन नागापुरे, बजरंग खारोडे, रोहित खारोडे,राजू आकोटकर, गोपाल खलोकार, अतुल खारोळे, संघम उंबरकर, प्रकाश बोंडे, अनिल खारोळे, शंकर पोटे, विक्की खारोळे, विलास नाठे, गजानन खारोळे, सुरेश खडके, प्रमोद खारोळे, गणेश काळे, श्रीकांत काळमेघ, रमेश सावळे आदी शेतक-यांनी केली आहे.

# ईद मिलादुन्नबीला १५०० वर्षे पूर्ण

## धामणगाव शहरात निघाली मिरवणूकमिरवणुकीच्या निमित्ताने हिंदू - मुस्लिम एकतेचे व सामाजिक सलोख्याचा आला प्रत्यय






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५धा.रेल्वे**

ईद मिलादुन्नबीला या पवित्र दिवसाला यंदा १५०० वर्षे पूर्ण झाली असून, मुस्लिम समाजात या ऐतिहासिक निमित्ताने मोठ्या उत्साहात उत्सव साजरा करण्यात आला. धामणगाव शहरातील दत्तापूर भागातून आकर्षक सजावट, नात-शरीफ पठण व मिरवणूक काढण्यात आली.यात हिंदू - मुस्लिम एकतेचे व सामाजिक सलोख्याचा प्रत्यय आला. ईद मिलादुन्नबी निमित्त संपूर्ण शहरात दिव्यांच्या रोषणाईने सजावट करण्यात आली होती.शहरातील दत्तापूर भागातून आकर्षक सजावट, नात-शरीफ पठण व मिरवणूक काढण्यात आली.मुस्लिम बांधवांसोबतच इतर समाजातील नागरिकांनीही कार्यक्रमांना भेट देऊन ऐक्याचा संदेश दिला.यावर्षीची ईद मिलादुन्नबी मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष म्हणजे हिंदू मुस्लिम एकताच संदेश दिसून आला.धामणगाव शहरातील आझाद गणेश मंडळ यांच्या वतीने मिरवणुकीत मध्ये झालेल्या नागरिकांसाठी चहापाणीची व्यवस्था केली होती. असे नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष नवीन कनोजिया यांनी प्रतिक्रिया देताना सांगितला आहे.. दत्तापूर पोलिस प्रशासनाकडून काटेकोर बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ८४ नागरिकांनी करुन घेतली हृदय तपासणी

## वीर संभाजी गणेशोत्सठ मंडळाचे आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे राजे वीर संभाजी गणेशोत्सठ मंडळ, चांदूररेल्वे यांच्यावतीने गणेश उत्सवानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये ८४ जणानी हृदय तपासणी करून या आरोग्य शिबिराचा लाभ घेताला.या कार्यक्रमाला संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय अमरावतीचे सचिव प्रा. कासेबंद वैद्यराज, राजेश चर्जन, डॉ. अनुज डोगरे, डॉ श्याम राठी, श्रीमती फासेबट, बडू आठवले, प्रत्ना मनवर, शिवानी मोटे, प्रांजली भाकरे, दिया टेंभुर्णे,सोनू धुर्वे, कपिल वर्मा, दुर्गेश बायस आदी मंडळी उपस्थित होते या सर्व पाहुण्याचे मंडळाच्यावतीने पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.रुग्णालयाचे सचिव प्रा. फासेबंद यांनी संत अच्युत महाराज हृदय रुग्णालयातील उपलब्ध सुविधांबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन पत्रकार प्रवीण शर्मा यांनी केले, तर आभार संस्थापक अध्यक्ष स्वप्नील मानकर यांनी मानले.शिबिराचया यशस्वीतेसाठी मोनू मुरायते, अर्पित देशमुख, गोपाल अविनाशे, निखिल बावणे, सुनील सदावर्ते, गौरव शिंदे, ऋषिकेश आडेकर, प्रणय खेरकर, श्रेयस उरकुडे, शुभम डाखरे, मयूर शिवरे, पोलाड, सनी गावंडे, चेतन वालदे, क्षीरसागर, अंश दीक्षित, देवेश विटीवाले, यश काळे, भूषण सोनटक्के, गौरव इंगळे, साहिल आडे, लकी पाटील, मन्यक शिंदे, शिवराज शर्मा आणि राजे वीर संभाजी गणेश मंडळाचे सदस्य यांनी सहकार्य केले.

# मेळघाटातील शेतकरी जीव धोक्यात घालून पिकांची करतात राखण

## रानडुक्कर,माकडांचा प्रचंड त्रास



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५धारणी**

मेळघाटात यंदा मका पिकाची लाट उसळली आहे. डोंगर-दऱ्यांत, काठाकाठी आणि सपाट पठारावर जिकडे नजर जाईल तिकडे 'मकाच मका' डोलत आहे. आदिवासी व इतर शेतकरी बांधवांनी मुसळधार पावसाच्या तडाख्यात, कमी जास्त खर्चात आणि श्रमांच्या मर्यादांवर मात करून पिके उभी केली; मात्र कापणीपूर्वीच वन्यप्राण्यांचा वाढता संचार शेतकऱ्यांसाठी नवे संकट बनत आहे.

परिसरातील शेतजमिनींवर रात्रीच्या वेळी वराहांचे कळप, दिवसाढवळ्या वानरांचे टोळके आणि इतर वन्यप्राण्यांची वर्दळ वाढली आहे. पिकांची पाने व कणीस कुरतडून होणारे नुकसान मोठ्या प्रमाणावरआहे. या पार्श्वभूमीवर अनेक कुटुंबे अक्षरशः रात्री शेतात मुक्काम करून जागत पिकांची राखण करीत आहेत. रात्रभर टाळ वाजवणे, मशाली-कंदिल, कधी कधी पेटविलेल्या आगेतुन प्राणी परतवण्याचा प्रयत्न करावा लागतो. काही ठिकाणी महिलादेखील पुरुषांसोबत रात्रीला जागरण करत असल्याचे चित्र दिसते. यंदा मका पिक चांगले आले आहे. कणीस भरले आहे. उत्पादनाची आशा आहे. परंतु वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई वेळेत आणि योग्य प्रमाणात मिळत नाही, अशी शेतकऱ्यांची तक्रार आहे. नुकसानाचे पंचनामे उशिरा होतात, पुरावे-कागदोपत्री प्रक्रियेत विलंब होतो आणि प्रत्यक्षात मिळणारी रक्कम तुटपुंजी आणि दुसरीकडे वन्य प्राण्यांचा हैदोसमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. या गंभीर बाबीकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

# शेतकऱ्यांची पहिली पसंती सोयाबीन - कापूस मागे पडला

## सोयाबीनची २.४६, कापसाची २.४३ हेक्टरवर पेरणी कृषी विभागाचा अंतिम पीक पाहणी अहवाल जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

कृषी विभागाच्या उद्दिष्टाप्रमाणे ६ लाख ७७ हजार २५८ क्षेत्रावर खरिपाची लागवड करण्यात आली असून याची टक्केवारी ९९.१६ टक्के इतकी आहे. यंदा देखील सोयाबीनच अव्वल असून २ लाख ४६ हजार ५०२ हेक्टरवर सोयाबीनची लागवड करण्यात आली असून दुसऱ्या क्रमांकावर कापसाची २ लाख ४३ हजार ७२९ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे.

खरीप हंगाम २०२५-२६ या वर्षातील अंतिम पिक पेरणी अहवाल जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यात एकूण ६,८२,९९२ हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन कृषी विभागाकडून आखण्यात आले होते. यापैकी ६ लाख ७७हजार २५८ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे.दर्यापूर तालुक्यात सर्वाधिक ७२,०४६ हेक्टर पेरणी झाली आहे.त्यानंतरनांदगाव खंडेश्वर तालुक्यात ६५,२०६ हेक्टर, मोर्शीत ५७,६६९ हेक्टरवर पेरणी झाली आहे. पिकनिहाय पाहता सोयाबीनचे वर्चस्व कायम असून एकूण २,४६,८८७ हेक्टर क्षेत्र सोयाबीनखाली आहे. त्याचबरोबर कापूस २,४३,७२९ हेक्टर, तूर १,२०,२३६ हेक्टर, मका ४३,८४८ हेक्टर, मूग ७९४ हेक्टर, ज्वारी ४,०५८ हेक्टर, बाजरी २५९ हेक्टर, तर भाजीपाला व इतर पिके ९.३३३ हेक्टर क्षेत्रात घेण्यात आली आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही सोयाबीन व कापूस हेच जिल्ह्यातील प्रमुख पिके ठरली असून तूर व मका या पिकांचे क्षेत्रदेखील लक्षणीय आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने हा आकडेवारीसह अंतिम अहवाल जाहीर केला आहे.

**चार तालुक्यांत शंभर टक्के पेरणी**

कृषी विभागाच्या आकडेवारीतून धारणी तालुक्यात १०५ टक्के पेरणी करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ चिखलदरा १०३ टक्के, भातकुली १०३ व धामणगाव रेल्वे तालुक्यात १०० टक्के पेरणी करण्यात आली आहे.

# संरक्षणशून्य मेघा पूल: नागरिकांचे जीव धोक्यात, प्रशासन झोपेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५शि.कसबा**

मेघा नदीवरील पुलाचे लोखंडी कठडे पुरात वाहून गेल्याने हा पूल आता अपघाताला आमंत्रण देत आहे.

चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथून वाहणाऱ्या मेघा नदीच्या पुलावरील लोखंडी कठडे १९ ऑगस्टला अचानक आलेल्या पुरामुळे आरसीसी कॉंक्रीट ढाचासहित वाहून गेले. एकंदरीत पुलावरील एका बाजूने संरक्षक कठडे नसल्याने नागरिकांत विशेषतः विद्यार्थीवर्गात भीती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे याच पुलावरून गणेश विसर्जन होणार आहे. खाली अथांग पाणी आणि वर कठडे गायब यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**गणेश विसर्जनात अपघाताचा संभाव्य धोका**

मेघा नदीच्या मुख्य पुलावर ७सप्टेंबरला गणपती विसर्जनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. रात्रीच्या वेळी बाप्पांच्या विसर्जनाला विशेषतःलहान मुले, (महिला सामील होतात. एकीकडे पुलाला कठडे नाहीत, बॅरिकेट्स नाही, ज्यामुळे पाय घसरून नदीमध्ये पडून वाहून जाण्याचे संकट निर्माण होत आहे. कठडे तुटून दोन आठवडे उलटूनही दुरुस्ती केली नसल्याने ही घोडचूक सुधारून संभाव्य अपघात टाळण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मुस्लिम बांधवांचा शहरात निघाला ईद-ए-मिलादुन्नबी जुलूस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

ईद-ए-मिलादुन्नबी (पैगंबर मोहम्मद साहेबांच्या जन्मदिवस) उत्साहात आज ५ सप्टेंबर रोजी साजरी करण्यात आली.

या निमित्ताने अमरावती शहरातील विविध रस्ते आणि चौक-चौरस्ते रोषणाईने सजवले गेले होते. मुस्लिम बांधवांमध्ये मोठ्या आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले.ईद मिलादच्या जुलूसाची जबाबदारी सिरातुन्नबी कमिटीचे अध्यक्ष मोहम्मद अशफाक आणि सचिव नजमोद्दीन यांच्यावर सोपवण्यात आली होती.कमिटीचे उपाध्यक्ष उमर खान, डॉ. हाफिज खान, सहसचिव अफसर बेग, कोषाध्यक्ष मोहम्मद इकबाल असून सदस्यांमध्ये सैयद निसार, आरिफ खान, हाजी मुश्ताक, शेख सलीम, मोहम्मद रफिक, इस्माईल रारानी, सिराज बाली, अयुब खान, हाजी रिजवान, आणि वसीम राजा यांचा समावेश होता.



आज ५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता हाथीपुरा येथील मस्जिद मिस्कीन शाहच्या मैदानातून जुलूसाला सुरुवात करण्यात आली.त्यानंतर हा जुलूस शहरातील ट्रान्सपोर्ट नगर,नागपुरी गेट,पठाण चौक, चित्रा चौक,विविध चौकांमधून मार्गक्रमण करत मद्रासी बाब दरगाहच्या मैदानात पोहोचला. तेथे परचम कुशाई (ध्वज फडकवणे) व सलातो सलाम (प्रार्थना) करण्यात आली आणि त्यानंतर जुलूसाचा समारोप करण्यात आला.जुलूस दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये या करिता प्रत्येक मुख्य चौकात पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला होता.या जुलुस मध्ये अनेक राजकीय नेत्यांनी आपला सहभाग नोंदवित शुभेच्छा दिल्यात.

# वाघांच्या हल्ल्यात महाराष्ट्र देशात अव्वल; एकट्या राज्यात २१८ बळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जागतिक स्तरावर वाघांच्या संख्येत भारत अव्वलस्थानी असला, तरी वाघ आणि मानव यांच्यातील संघर्ष दिवसागणिक वाढत आहे. सन २०२० ते २०२४ या कालावधीत देशभरात वाघांच्या हल्ल्यात तब्बल ३७८ जणांचा मृत्यू झाला असून, त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात २१८ मृत्यू झाले आहेत. विशेषतः चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात मृत्यूची आकडेवारी सर्वाधिक आहे. तर मेळघाटात गेल्या तीन वर्षात सहा जणांचे बळी गेले आहेत.



मानव-वन्यजीव संघर्ष या गंभीर समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहेत. मानवी वस्तीजवळ फिरणाऱ्या वाघांवर लक्ष ठेवणे, त्यांना पुन्हा जंगलात सोडणे आणि लोकांना यासंदर्भात जागरूक करणे, ही प्रक्रिया निरंतर सुरूच आहे.
**आदर्श रेड्डी, क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प**

राज्यात ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा, पेंच, मेळघाट, बोर व सह्याद्री, असे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. तर, ४८ अभयारण्ये असून, ४ संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत. व्याघ्र प्रकल्पात जागा अपुरी पडत असल्याने वाघांनी नवा कॉरिडॉर शोधला असून, नजीकच्या राखीव जंगलाच्या दिशेने त्यांनी मुक्काम हलविल्याने मानव-वन्यजीव संघर्ष होत असल्याची माहिती वन्यजीव अभ्यासक यादव तरटे पाटील यांनी दिली.

गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रात वाघांची संख्या वाढत असली तरी त्यांच्या मृत्यूची संख्याही वाढलेली आहे. विविध कारणांमुळे वाघांचा मृत्यू होत आहे, ज्यात नैसर्गिक मृत्यू, दोन वाघांमधील संघर्ष आणि मानवी हस्तक्षेपामुळे होणारे अनैसर्गिक मृत्यू, शिकार, अपघात, विद्युतधक्का आदींचा समावेश आहे.

# बुलढाण्यात लाखोंचा गुटखा जप्त; एलसीबीच्या टीम कडून एकाला अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५बुलढाणा**

बंदी असताना गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक व विक्री करण्यास बंदी असताना देखील गुटख्याची अवैधपणे वाहतूक केली जात आहे. बुलढाण्यात अशाच प्रकारे गुटखा वाहतूक केली जात असताना एलसीबीच्या टीमने कारवाई केली आहे. या कारवाईत २५ लाख रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला असून एक जणाला ताब्यात घेतले आहे.

बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील आंबुलकर यांना गुप्त माहितीच्या आधारे खामगाव परिसरात महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा अवैधरित्या वाहतुक होत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस पथक आणि अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषधी प्रशासन विभाग यांचे पथक तयार करून सापळा रचण्यात आला होता.

खामगाव तालुक्यातील पारखेड फाटा येथे पथकाने सापळा रचून संशयित वाहन तपासण्यात आले. तपासणी दरम्यान वाहनातून महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा आढळून आला. यात सुमारे २५ लाख रुपयांचा गुटखा आढळून आले. दरम्यान पथकाने वाहनासह ५० लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे गुटखा तस्करांचे धाबे दणाणले आहे.

**युवकाला ताब्यात घेत गुन्हा दाखल**

स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याच्या अवैध वाहतुकीविरुद्ध मोठी कारवाई करत २५ लाख ३५ हजार रुपयांचा गुटखा पकडला आहे. तर या प्रकरणी रामराज दुल्हारे (रा. फतेपुर, उत्तरप्रदेश) या युवकाला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्या विरुद्ध खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा आणि औषध प्रशासन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# शिकस्त पुलावर अखेर सुरक्षा भिंत; अमरावतीत वाहतूक पूर्णतः थांबवली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

शहरातील ६० वर्षे जुना रेल्वे उड्डाणपुल आता शिकस्त झाल्याने प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. पुलावरून होणारी सर्व प्रकारची वाहतूक थांबवण्यात आली असून, कोणतेही वाहन पुलावर जाऊ नये म्हणून आता पुलाच्या दोन्ही टोकांवर विटांची मजबूत सुरक्षा भिंत उभारण्यात आली आहे.या पुलाची अवस्था अत्यंत धोकादायक झाल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. पुलाच्या तपासणीनंतर तांत्रिक अधिकाऱ्यांनी याचा वापर बंद करण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर वाहतूक बंदी लागू करण्यात आली होती.सध्या या भागातील वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळवण्यात आली असून, प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. पुलाच्या पुनर्बांधणीसाठी लवकरच प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याची माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी मनपाची आर्टीफिशीयल टँक व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

उद्या अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने पर्यावरणपूरक आणि स्वच्छ गणेश विसर्जनाची दिशा ठेवत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यंदाच्या वर्षी शहरातील नागरिकांना विसर्जनासाठी नदी, तलाव याठिकाणी न जाता सुलभ आणि सुरक्षित अशी २३ ठिकाणी आर्टीफिशीयल टँकची व्यवस्था करण्यात आली आहे.



महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या पुढाकाराने साकारलेल्या या उपक्रमामुळे नदी-तलावांचे प्रदूषण टाळण्यास मदत होणार असून स्वच्छतेचे भान राखण्याचा संदेश दिला जात आहे.घरगुती आणि सार्वजनिक गणेश मूर्तींचे विसर्जन आर्टीफिशीयल टँकमध्येच करावे. हे आपले पर्यावरणाचे रक्षण करण्याचे सामूहिक कर्तव्य आहे,

असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना केले.शहरातील पाच झोनमध्ये विभागलेल्या २३ ठिकाणी टँक ठेवण्यात आले असून प्रत्येक ठिकाणी स्वास्थ्य निरीक्षक व नियंत्रण अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. यासोबतच नागरिकांच्या मदतीसाठी संबंधित अधिकार्यांचे संपर्क क्रमांकही प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत 'विद्युत सुरक्षा' ठेवा लक्षात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

गणेशोत्सवाचा समारोप अनंत चतुर्दशीला मोठ्या उत्साहात होतो. मिरवणुकांमध्ये ञा, ढोल-ताशा आणि विद्युत रोषणाईचा जल्लोष असतो. मात्र याच वेळी विद्युत अपघातांची शक्यता वाढते. म्हणूनच महावितरणने विसर्जन मिरवणुकीत विद्युत सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

मंडळांनी मिरवणुकीचा मार्ग निश्चित करून त्यावर असलेले विजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर, लोंबकळणाऱ्या तारा यांची माहिती घ्यावी. उंच मूर्ती किंवा वाहनांचा वापर करताना तारांपासून सुरक्षित अंतर ठेवावे. स्वयंसेवकांच्या मदतीने मार्ग सुरक्षित ठेवा.

मंडप व मिरवणुकीतील रोषणाईसाठी ISI मानांकित व दर्जेदार विद्युत उपकरणे वापरावीत. सैल वायरिंग किंवा निकृष्ट तारा टाळाव्यात. जनरेटर योग्य ठिकाणी ठेवून वायर सुरक्षितरित्या जोडाव्यात. ओल्या जागांवर कोणतीही इलेक्ट्रिक सामग्री वापरू नये.

**विसर्जनस्थळी काळजी**

प्रशासनाने निश्चित केलेल्या तलावातच विसर्जन करावे. पाण्यात उतरताना वायर, खुले स्विचेस किंवा खांब यापासून दूर रहावे. पाण्यात मोबाईल वा विद्युत उपकरणे नेऊ नयेत.

तुटलेली वायर, ठिणगी किंवा अपघात दिसल्यास महावितरण वा पोलिसांना त्वरित कळवा. विजेचा धक्का बसल्यास लाकडी वस्तू वापरून मदत करावी आणि तात्काळ वैद्यकीय मदत घ्यावी.

# गुरुजी पेचात; सात रुपयांत कशी शिजणार 'पोषण शक्ती'ची खिचडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत तांदळासोबत पूरक खाद्य बनविण्यासाठी देण्यात येणारा निधी तोकडा आहे. त्यामुळे मुख्याध्यापक, शिक्षकांना पदरमोड करावी लागत आहे.



सध्या १ ली ते ५ वीतील विद्यार्थ्यांना ६ रुपये १९ पैसे तर ६ वी ते ८ वीतील विद्यार्थ्यांसाठी ९ रुपये २९ पैसे इतके अनुदान शासनाकडून दिले जात असल्याचे सांगण्यात येते. पोषण आहार शिजविण्यासाठी प्रतिविद्यार्थी दिले जाणारे अनुदान कमी आहे.केंद्र सरकारने विद्यार्थ्यांसाठी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत या सत्रात जवळपास ५९ पैशांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पोषण आहारातील खाद्यपदार्थ तयार करून घेताना मुख्याध्यापक, शिक्षकांची कसरत होत आहे.

# राजापेठ झोन येथे जलजन्य कीटकजन्य आजारावर डॉ विशाल काळे यांनी घेतला आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

सार्वजनिक आरोग्य विभाग महानगरपालिका अमरावती, आरोग्य विभाग व स्वच्छता विभाग यांना श्रीमती सौम्या चांडक आयुक्त महानगरपालिका अमरावती,श्रीमती शिल्पा नाईक, अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका अमरावती यांच्या सूचनेनुसार राजापेठ झोन येथे डॉ. विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी महानगर पालिका यांनी बैठक घेऊन वरील वरिष्ठांनी केलेल्या सूचनाचे मार्गदर्शन केले. राष्ट्रीय कीटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शहरात असलेले डेंगू ,मलेरिया, चिकनगुनिया व इतर कीटकजन्य आजारांवर कशाप्रकारे प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येईल याविषयी मार्गदर्शन केले. यावेळेस वरिष्ठांनी केलेल्या सूचनेनुसार प्रत्येक कार्यक्षेत्रामध्ये सकाळी धुवारणी व फवारणी करून डासांचा वाढता प्रादुर्भाव कमी होईल व व कीटकजन्य आजारांवर आळा घालता येईल या विषयी डॉ.विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. तसेच आरोग्य विभाग व स्वच्छता विभाग यांनी समन्वय साधून काम जर केले तर येणारा काळात कीटकजन्य आजारांवर मात करता येईल. याविषयीचा कृती आराखडा आरोग्य विभाग व स्वच्छता विभाग यांनी मिळून बनवावा अशा सूचना देण्यात आला.तसेच डॉ. रुपेश खडसे साथ रोग अधिकारी मनपा अमरावती यांनी सुध्या घरोघरी जाऊन कंटेनर खाली करावे टेमिफॉस ॲक्टिव्हिटी करावे जनतेला एक दिवस कोरडा पाळण्यास सांगावे व जलजन्य आजारासाठी नियमित पाणी पिण्यास योग्य आहे किंवा नाही याचि खात्री करूनच प्यावे असे मार्गदर्शन केले व हैदर अली यांनी सर्व आरोग्य सेवक व ब्रेडिंग चेकर यांचे मासिक अहवाल सादर केले मासिक अहवाल पाहून डॉ विशाल काळे यांनी छान कौतुक केले ह्या मध्ये प्रत्येक झोननिहाय वरिष्ठ स्वास्थ निरीक्षक ,स्वच्छता विभाग मनपा अमरावती यांना सुद्धा रोज फवारणी धुवरानी झाले पाहिजे अशा सूचना दिल्यात ह्या आढावा बैठक मध्ये आरोग्य विभागाचे सर्व आरोग्य कर्मचारी व ब्रीडिंग चेकर्स उपस्थित होते.


# वनसंवर्धनात नवा टप्पा; 'रेंजर' आता चालणार नव्या वेगात

## जंगल संरक्षणासाठी दुर्गम भागात गस्त घालणे होणार सोपे

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जंगलामध्ये गस्त घालणे,वन्यप्राणी संरक्षण, मानव-वन्यजीव संघर्ष, वणवा प्रतिबंध, वन्यप्राण्यांचा बचाव, रोपवन संरक्षण आदी प्रकारचे कार्य असलेल्या प्रादेशिक वन विभागाच्या वनरपरिक्षेत्रांसह वन्यजीव विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी (रेंजर) यांना राज्य कॅम्पा निधीचा वापर करून वाहने खरेदी करता येणार आहेत. याबाबतचा शासन निर्णय काढण्यात आला असून, जंगलातील तस्करांना रोखण्यासाठी वन विभागाच्या ताफ्यात आता 'थार', 'स्कॉर्पिओ' यासारखी दमदार वाहने दाखल होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना चांगल्या दर्जाची मजबूत आधुनिक वाहने उपलब्ध झाल्यानंतर लाकडांची, वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी करणाऱ्यांचा पाठलाग करत त्यांना रोखणे शक्य होणार आहे. एकूणच वन तस्करीच्या गुन्ह्यांना आळा घालता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.नवीन वाहनांना मंजुरी देताना सामाजिक वनीकरण विभागाच्या ८० वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना वगळण्यात आले आहे.सध्या जिल्ह्यातील दुर्गम भागात तस्करांची वाहने सुसाट धावत वनक्षेत्रांमध्ये धुमाकूळ घालत आहेत.जुन्या झालेल्या टाटा सुमो किंवा झेनॉनसारख्या वाहनांद्वारे या तस्करांचा पाठलाग करताना वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या वाहनचालकांना कसरत करावी लागते.



**कोणती वाहने खरेदी करता येणार?**

राज्य शासनाने शासन निर्णयात म्हटल्याप्रमाणे बोलेरो जीप, थार जीप, स्कॉर्पिओ कार, टाटा सुमो, इटिंगा कार यासारख्या वाहनांची राज्य कॅम्पाच्या निधीमधून वन विभागाला खरेदी करता येणार आहे.